सूचना का
अधिकार
**माहितीचा अधिकार**
**Right to Information**

सामान्य प्रशासन विभाग
१९ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०४९५४३

क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. २५२/१५ /का.सहा

दिनांक : १.४.२०१६.

प्रति,

सहसचिव/उपसचिव (आस्थापना)/ माहिती अधिकार समन्वयक,
महसूल व वन विभाग, नगर विकास विभाग, गृह विभाग,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग,
शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कृषि व सहकार विभाग,
उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील तरतूदींच्या अंमलबजावणीबाबत.

महोदय,

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ अंतर्गत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने आपले अभिलेख योग्य रीतीने सुचिबध्द करणे, त्याची निर्देशसूची तयार करणे आणि अभिलेख्याचे संगणकीकरण करणे व ते नेटवर्कमार्फत जोडणे आवश्यक आहे. ज्या विषयांबाबत नागरिकांकडून वारंवार माहिती मागण्यात येते अशा विषयांची माहिती प्रत्येक विभागाने संकेतस्थळावर ठेवल्यास system improvement होऊन नागरिकांची सोय होऊ शकते अशी सूचना मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.२६.१.२०१६ रोजी सहयाद्रीवरील Online R.T.I. सुविधेची व्याप्ती विभागीय मुख्यालयांच्या स्तरापर्यंत वाढविण्याच्या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी केली आहे. राज्य माहिती आयोगानेही या संदर्भात अधिनियमातील कलम १९ (८) (क) अंतर्गत वेळोवेळी निर्देश दिल्याचे नमूद करून विशेषत: महसूल विभाग, नगर विकास विभाग, गृह विभाग, ग्राम विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, शिक्षण विभाग, कृषि विभाग आणि महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी इत्यादी सार्वजनिक प्राधिकरणांकडून वेळोवेळी काही विषयांवर माहिती मागीतली जात असल्याचे नमूद करून या व अशा सर्व विभागांनी त्यांच्या संदर्भात मागण्यात येणाऱ्या विविध विषयांबाबत शक्य होईल तेवढी माहिती संकेतस्थळावर (website) ठेवण्याबाबत संबंधीत विभागांना सूचना द्याव्यात असे कळविले आहे. मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या दि. ८.३.२०१६ च्या पत्राची प्रत आपल्या माहितीस्तव सोबत जोडली आहे.

२. उपरोक्त बाब सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरणे तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचना देण्यात याव्यात.

आपला,

(रा.मा.जाधव)
शासनाचे उप सचिव.

सोबत — वरिलप्रमाणे.

प्रत-सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
कार्यासन सहा संग्रहार्थ.